# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY

NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade




## P.G. SECTION


**Phone: (02462) 229242**
**Fax : (02462) 229574**

**Website: www.srtmun.ac.in**

**E-mail: dr.pg.srtmun@gmail.com**


जा.क्र. पीजी/परीक्षा/२०१५–२०१६/३४७९ दि.०५/०१/२०१६

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
(विधी, आभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय वगळता)
प्रस्तुत विद्यापीठ.

विषयः– उन्हाळी २०१५ परीक्षा अगोदर घेणे बाबत.

महोदय/महोदया,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रात व एकंदरीत मराठवाडा विभागात मागील तीन–चार वर्षापासून कमी प्रमाणात पाऊस झाला आहे. तसेच चालू शैक्षणिक वर्ष २०१५–१६ मध्ये देखील विद्यापीठ कार्यक्षेत्रातील चारही जिल्हयात पाऊस अत्यंत कमी पडल्याने मा. विद्या परीषद बैठकीत परीक्षा काळात कडक उन्हाळयाचा व भीषण पाणी टंचाईचा त्रास विद्यार्थ्यांना होवू नये यासाठी २०१५–१६ च्या व्दितीय सत्राच्या पदवी व पदव्युत्तर परीक्षा साधारणतः १५ मार्च २०१६ पासून घेण्यांचे ठरले आहे. सदर निर्णयास दि.२८/१२/२०१५ रोजी आयोजित बैठकीत प्राचार्यानी ही सहमती दर्शविली आहे.

उक्त निर्णयांच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, १५ मार्च २०१६ पासून पदवी व पदव्युत्तर परीक्षा सुरू होणार असल्याने या बाबत जादा तासिका घेवून अभ्यासक्रम पूर्ण करण्यांचे नियोजन, शैक्षणिक कार्यदिवसांची कार्यवाही व वेळापत्रक प्राचार्यांनी आपल्या स्तरावर तयार करून महाविद्यालयांतील शिक्षक तसेच विद्यार्थी यांना पूर्व कल्पना देवून त्याची अंमलबजावणी करावी.

स्वा/–
**संचालक**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत :–

१. मा.परीक्षा नियंत्रक, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहिती व मा.विद्या परीषदेच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाहीस्तव.
२. जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहिती व वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द करण्यास्तव
३. श्री. ए. ए. दर्शनकार, सिस्टीम एक्सपर्ट, युजीसी संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यांत येते की, सदर पत्र BCUD व NEWS/CIRCULAR-BCUD अतंर्गत Letter regarding prepone of UG & PG Exam या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात यावी.